श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे जुलै ते ऑक्टोबर,२०१९ करीता अनुदानाचे वितरण.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: श्राबायो -२०१९/प्र क्र.४०/विसयो
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २४ जुलै, २०१९.

वाचा :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१०/प्र.क्र.१७५/विसयो २, दि. २६ ऑक्टोबर २०१०.
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.०२/कोषा-प्र.५, दि.११/०१/२०१९.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. ०८ जुलै, २०१९.
४. शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक बीजीटी २०१९/प्र.क्र.४९/ अर्थसंकल्प, दिनांक १८ जुलै, २०१९.
५. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. श्राबायो २०१९/प्र.क्र.४०/विसयो, दिनांक २४.०४.२०१९.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता **अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी** श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये ११०,००,००,०००/- (रुपये एकशे दहा कोटी फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे. वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक ३ येथील शासन परिपत्रकान्वये श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेसाठी एप्रिल ते डिसेंबर, २०१९ या कालावधीच्या खर्चासाठी एकूण तरतूदीच्या ६० टक्के म्हणजेच रुपये ६६,००,००,०००/- इतका निधी उपलब्ध झाला असून त्यापैकी संदर्भ क्रमांक ५ येथील शासन निर्णयान्वये माहे एप्रिल ते जुलै, २०१९ या कालावधीच्या खर्चासाठी रुपये ३६,६६,६४,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. आता श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांकरीता उर्वरित रुपये २९,३३,३६,०००/- (रुपये एकोणतीस कोटी तेहतीस लक्ष छत्तीस हजार फक्त) माहे जुलै ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीच्या खर्चासाठी या शासन निर्णयान्वये सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे वितरीत करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे. तसेच मासिक विवरणपत्रानुसार निधी पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणालीवर देण्यात आलेली आहे.

२. सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की, सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ New CO Code वर संबंधित जिल्हयाना निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यांनी वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या जिल्हयातील तालुक्यांना लाभार्थ्यांच्या प्रमाणानुसार करावे. सदरचे अनुदान वितरण जिल्हाधिकाऱ्यांनी कळविलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार करण्यात आले आहे. संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकानुसार उणे पध्दतीने प्राधिकारपत्र काढण्यास मुभा आहे.

३. सदरहू निधीमधून झालेला खर्च "मागणी क्रमांक एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण, ७८९ अनुसूचित जाती उपयोजना, (०१) वृध्द, दुर्बल व निराधारांना अनुदान, (०१)

(०२) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना (अजाउयो) (कार्यक्रम), ५०-इतर खर्च, (२२३५ सी १४३) " या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४. सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्र.३ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकातील अटी व शर्तीची पुर्तता करुन कोषागारात देयके सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

५. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असेही कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

६. हा शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अर्थसं २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०७२५१६०२२१७४२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prashant Pundlik Wagh

Digitally signed by Prashant Pundlik Wagh
DN: CN = Prashant Pundlik Wagh, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Social Justice and Special Assistance
Date: 2019.07.25 16:10:36 +05'30'

(प्रशान्त पुं. वाघ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद
२. सर्व जिल्हाधिकारी.
३. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७. वित्त विभाग, अर्थसंकल्प ३ ,४, ५ अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई
८. सह सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), लेखापरिक्षण कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती, विसयो.

विवरणपत्र

शासन निर्णय क्र.श्राबायो-२०१९/प्र.क्र.४०/विसयो, दिनांक : २४ जुलै, २०१९ सोबतचे सहपत्र.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता अनुदानाचे वितरण

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना (२२३५ सी १४३)

अनुसूचित जाती लाभार्थी (रक्कम रुपयात)

अ.क्र.	जिल्हा	नियंत्रक अधिकारी क्रमांक	अनुसूचित जाती लाभार्थी संख्या	जुलै, १९	ऑगस्ट,१९	सप्टें.,१९	ऑक्टो.,१९	या आदेशान्वये एकूण वितरीत रक्कम
१	२	३	४	५	६	७	८	९
१	मुंबई शहर	N0028	१७५	४०५८९	४०५८९	४०५८९	४०५८९	१६२३५६
२	मुंबईउपनगर	N0029	७४०	१७१६३७	१७१६३७	१७१६३७	१७१६३७	६८६५४८
३	ठाणे	N0036	२३३४	५४१३५२	५४१३५२	५४१३५२	५४१३५२	२१६५४०८
४	रायगड	N0012	५७७	१३३८३०	१३३८३०	१३३८३०	१३३८३०	५३५३२०
५	रत्नागिरी	N0023	११६८	२७०९०८	२७०९०८	२७०९०८	२७०९०८	१०८३६३२
६	सिंधुदूर्ग	N0018	६९१	१६०२७१	१६०२७१	१६०२७१	१६०२७१	६४१०८४
७	पालघर	N0037	३३३६	७७३७५८	७७३७५८	७७३७५८	७७३७५८	३०९५०३२
	कोंकण विभाग		**९०२१**	**२०९२३४५**	**२०९२३४५**	**२०९२३४५**	**२०९२३४५**	**८३६९३८०**
८	नाशिक	N0006	६३५२	१४७३२९४	१४७३२९४	१४७३२९४	१४७३२९४	५८९३१७६
९	धुळे	N0026	८४५९	१९६१९९६	१९६१९९६	१९६१९९६	१९६१९९६	७८४७९८४
१०	जळगाव	N0010	१७७०१	४१०५६०३	४१०५६०३	४१०५६०३	४१०५६०३	१६४२२४१२
११	अहमदनगर	N0030	१११४१	२५८४०६४	२५८४०६४	२५८४०६४	२५८४०६४	१०३३६२५६
१२	नंदुरबार	N0027	१६४३	३८१०८०	३८१०८०	३८१०८०	३८१०८०	१५२४३२०
	नाशिक विभाग		**४५२९६**	**१०५०६०३७**	**१०५०६०३७**	**१०५०६०३७**	**१०५०६०३७**	**४२०२४१४८**
१३	पुणे	N0040	३१६२	७३३४००	७३३४००	७३३४००	७३३४००	२९३३६००
१४	सोलापूर	N0019	११२६३	२६१२३६१	२६१२३६१	२६१२३६१	२६१२३६१	१०४४९४४४
१५	सातारा	N0032	२२२५	५१६०७०	५१६०७०	५१६०७०	५१६०७०	२०६४२८०
१६	सांगली	N0008	२१८९	५०७७२०	५०७७२०	५०७७२०	५०७७२०	२०३०८८०
१७	कोल्हापूर	N0039	११९१७	२७६४०५१	२७६४०५१	२७६४०५१	२७६४०५१	११०५६२०४
	पुणे विभाग		**३०७५६**	**७१३३६०२**	**७१३३६०२**	**७१३३६०२**	**७१३३६०२**	**२८५३४४०८**
१८	नागपूर	N0014	२११७१	४९१०४४२	४९१०४४२	४९१०४४२	४९१०४४२	१९६४१७६८
१९	वर्धा	N0025	११८३५	२७४५०३२	२७४५०३२	२७४५०३२	२७४५०३२	१०९८०१२८
२०	चंद्रपूर	N0021	१५०८७	३४९९३०७	३४९९३०७	३४९९३०७	३४९९३०७	१३९९७२२८
२१	भंडारा	N0033	१८५३२	४२९८३४७	४२९८३४७	४२९८३४७	४२९८३४७	१७१९३३८८
२२	गडचिरोली	N0013	९२७६	२१५१४९३	२१५१४९३	२१५१४९३	२१५१४९३	८६०५९७२
२३	गोंदिया	N0024	४७७७	११०७९८६	११०७९८६	११०७९८६	११०७९८६	४४३१९४४
	नागपूर विभाग		**८०६७८**	**१८७१२६०७**	**१८७१२६०७**	**१८७१२६०७**	**१८७१२६०७**	**७४८५०४२८**
२४	अमरावती	N0011	२१९९५	५१०१५६२	५१०१५६२	५१०१५६२	५१०१६३८	२०४०६३२४
२५	अकोला	N0041	१०३६४	२४०३८४५	२४०३८४५	२४०३८४५	२४०३८४५	९६१५३८०
२६	यवतमाळ	N0007	१०१९४	२३६४४१५	२३६४४१५	२३६४४१५	२३६४४१५	९४५७६६०
२७	बुलढाणा	N0038	२१७७४	५०५०३०३	५०५०३०३	५०५०३०३	५०५०३०३	२०२०१२१२
२८	वाशिम	N0022	११७७२	२७३०४२०	२७३०४२०	२७३०४२०	२७३०४२०	१०९२१६८०
	अमरावती विभाग		**७६०९९**	**१७६५०५४५**	**१७६५०५४५**	**१७६५०५४५**	**१७६५०६२१**	**७०६०२२५६**
२९	औरगाबाद	N0035	९८२९	२२७९७५६	२२७९७५६	२२७९७५६	२२७९७५६	९११९०२४
३०	बीड	N0034	२०४४०	४७४०८९२	४७४०८९२	४७४०८९२	४७४०८९२	१८९६३५६८
३१	नांदेड	N0031	१०५२३	२४४०७२४	२४४०७२४	२४४०७२४	२४४०७२४	९७६२८९६
३२	परभणी	N0016	६०४७	१४०२५५२	१४०२५५२	१४०२५५२	१४०२५५२	५६१०२०८
३३	उस्मानाबाद	N0020	८४७	१९६४५४	१९६४५४	१९६४५४	१९६४५४	७८५८१६
३४	जालना	N0015	३३३६	७७३७५८	७७३७५८	७७३७५८	७७३७५८	३०९५०३२
३५	लातूर	N0009	१८८०४	४३६१४३५	४३६१४३५	४३६१४३५	४३६१४३५	१७४४५७४०
३६	हिंगोली	N0017	४४९८	१०४३२७४	१०४३२७४	१०४३२७४	१०४३२७४	४१७३०९६
	औरंगाबाद विभाग		**७४३२४**	**१७२३८८४५**	**१७२३८८४५**	**१७२३८८४५**	**१७२३८८४५**	**६८९५५३८०**
	एकूण		**३१६१७४**	**७३३३३९८१**	**७३३३३९८१**	**७३३३३९८१**	**७३३३४०५७**	**२९३३३६०००**